पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारित

# मराठी व्याकरण, निबंधमाला व कल्पनाविस्तार

## इयत्ता ५ वी ते ७ वी साठी

संभाजी पाटील

*विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तिका*
७० निबंध व कल्पनाविस्तारांचा एकत्रित संग्रह

| | | |
|---|---|---|
| * वर्णमाला | * संधी | * शब्दांच्या जाती |
| * लिंग | * वचन | * विभक्ती |
| * प्रयोग | * वाक्यांचे प्रकार | * विरामचिन्हे |
| * शुद्धलेखन | * निबंधमाला | * कल्पनाविस्तार |

परी प्रकाशन, कोल्हापूर

KD2

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मराठी व्याकरण, निबंधमाला व कल्पनाविस्तार (५ वी ते ७ वी)**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१
pariprakashan@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
१५ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १००/-

पंखांत नुकतेच बळ आलेल्या,
आकाशात उंच 'गरुडझेप' घेऊ
पाहणाऱ्या चिमुकल्यांना....

# मनोगत ...

'मराठी' ही आपली मातृभाषा. लहानपणापासूनच आपण मातृभाषा शिकतो. बोलीभाषेचा आणि व्याकरणाचा काडिमात्र संबंध नसतो; पण प्रमाणभाषेत बोलायचे किंवा लिहायचे झाल्यास शुद्ध व्याकरणाचा अभ्यास असणे गरजेचे आहे.

सध्या स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी लहानपणापासूनच 'भाषा' विषयाचे ज्ञान समृद्ध करायला हवे. म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान समृद्ध होण्यासाठी व्याकरणाबरोबरच ओघवत्या भाषेतील निबंध आणि कल्पनाविस्तार यांचाही अभ्यास महत्त्वाचा असतो.

सदर इयत्ता ५ वी ते ७ वी या व्याकरणाच्या पुस्तकांत अभ्यासक्रम मंडळाने निश्चित केलेल्या व्याकरणाबरोबरच निबंध आणि कल्पनाविस्तार यांचाही समावेश केलेला आहे. पुस्तकातील व्याकरणविषयक संबोध, संकल्पना, स्पष्टीकरणे आणि निबंध–कल्पनाविस्तार यांचे लेखन मुलांना समजेल अशा साध्या, सोप्या, सुटसुटीत आणि ओघवत्या भाषेत केलेले आहे. व्याकरणाची मांडणी 'ज्ञाताकडून अज्ञाताकडे' अशी केली आहे. वर्णमाला, संधी, शब्दांच्या जाती, लिंग, वचन, प्रयोग, विभक्ती, विरामचिन्हे, शुद्धलेखनाचे नियम यांची मांडणी सविस्तर केली आहे.

'निबंध' म्हणजे नियम बांधणे, गुंफणे, जुळवणे. दिलेल्या विषयाचा आशय सांगितलेल्या मर्यादित शब्दांत नियमबद्ध पद्धतीने गुंफणे म्हणजे निबंध होय.

मुलांना निबंध किंवा कल्पनाविस्तार लिहायला सांगितला, तर त्यांची एकच अडचण ! शब्दभांडार कमी आणि दिलेल्या विषयाला कसा फुलोरा द्यायचा याबद्दल अज्ञान. मुलांना उत्तम प्रकारचे निबंध लिहायचे असतील तर त्यांच्यासमोर उत्तम प्रकारचे निबंध ठेवायला हवेत आणि हेच काम सदरच्या पुस्तकातून करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

'मराठी व्याकरण, निबंधमाला आणि कल्पनाविस्तार' यांचा एकत्रित संग्रह असणारी पुस्तके दुर्मिळच. म्हणूनच हा एक वेगळा प्रयोग केला आहे. सदर पुस्तकातून मुलांची ज्ञानसमृद्धी निश्चितच वाढेल. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला चालना मिळेल, शिवाय शिक्षक, पालक, स्पर्धात्मक परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी यांनाही निश्चितच हे पुस्तक आवडेल अशी मनोमन खात्री आहे.

**– संभाजी पाटील**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | प्रकरण व तपशील | पान क्रं. |
|---|---|---|
| (१) | **वर्णविचार :**<br>स्वर, स्वरांचे प्रकार, व्यंजने,<br>व्यंजनांची उच्चार स्थाने. | ११ |
| (२) | **संधी :**<br>संधीचे प्रकार, स्वरसंधीचे नियम,<br>व्यंजनसंधीचे नियम, विसर्ग संधीचे नियम. | १७ |
| (३) | **शब्दांच्या जाती :**<br>नाम, नामाचे पोट प्रकार, सर्वनाम, सर्वनामाचे पोटप्रकार,<br>विशेषण, विशेषणाचे पोटप्रकार, क्रियापद, कर्ता,<br>कर्म, क्रियापदाचे प्रकार, क्रियापदाचे काळ,<br>क्रियापदाचे अर्थ, क्रियाविशेषण, क्रिया विशेषणाचे प्रकार,<br>शब्दयोगी, शब्दयोगीचे प्रकार, उभयान्वयी,<br>उभयान्वयीचे प्रकार, केवलप्रयोगी, केवल<br>प्रयोगीचे प्रकार. | २६ |
| (४) | **लिंग :**<br>लिंग व लिंगाचे प्रकार, उदाहरणे. | ६७ |
| (५) | **वचन :**<br>वचन व वचनाचे प्रकार, उदाहरणे. | ७१ |
| (६) | **विभक्ती व विभक्तीचे कारकार्थ :**<br>विभक्ती : अर्थ, प्रत्यय, विभक्तीचे कारकार्थ. | ७६ |
| (७) | **प्रयोग :**<br>प्रयोग : अर्थ, प्रकार. | ८२ |
| (८) | **वाक्यांचे प्रकार :**<br>विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, उद्गारार्थी,<br>होकारार्थी व नकारार्थी, केवल वाक्य,<br>मिश्र वाक्य, संयुक्त वाक्य. | ८८ |

**(९) विरामचिन्हे :** — **९३**

विरामचिन्हे व उदाहरणे.

---

**(१०) शुद्धलेखन :** — **९५**

शुद्धलेखनाचे नियम, सामान्य रूपे,
शुद्ध शब्दांची यादी

---

**(११) निबंधमाला** — १०१

- अ) निबंध लेखनाची पूर्वतयारी — १०१
- १) माझी आई — १०३
- २) माझी शाळा — १०३
- ३) माझा गाव — १०४
- ४) माझा देश — १०५
- ५) माझे गुरुजी — १०६
- ६) माझा आवडता छंद — १०६
- ७) माझा आवडता सण – दिवाळी — १०७
- ८) माझा आवडता सण – विजया दशमी — १०८
- ९) माझा आवडता सण – गुढीपाडवा — १०९
- १०) माझा आवडता सण – गणेश चतुर्थी — १०९
- ११) स्वातंत्र्यदिन — ११०
- १२) राष्ट्रपिता महात्मा गांधी — १११
- १३) नेताजी सुभाषचंद्र बोस — ११२
- १४) छत्रपती शिवाजी महाराज — ११३
- १५) राजर्षी शाहू महाराज — ११४
- १६) पंडित जवाहरलाल नेहरू — ११५
- १७) दलितांचे कैवारी – डॉ. आंबेडकर — ११६
- १८) माझा आवडता खेळ — ११७
- १९) माझा आवडता पक्षी – मोर — ११७
- २०) माझा आवडता प्राणी – वाघ — ११८
- २१) सूर्य उगवला नाही तर... — ११९
- २२) मला लॉटरी लागली तर... — १२०
- २३) मला पंख फुटले तर... — १२०
- २४) मी सरपंच झालो तर... — १२१
- २५) आई संपावर गेली तर... — १२२
- २६) उन्हाळा — १२३
- २७) पावसाळा — १२४
- २८) हिवाळा — १२४
- २९) प्रदुषणाचा भस्मासुर — १२५
- ३०) दूरदर्शन – शाप की वरदान — १२६
- ३१) आमची सहल — १२७
- ३२) एस. टी. स्टँडवरील एक तास — १२८
- ३३) मी पाहिलेला अपघात — १२९
- ३४) म्हाताऱ्या बैलाचे आत्मवृत्त — १२९
- ३५) पडक्या मंदिराचे आत्मवृत्त — १३०
- ३६) नदीचे आत्मवृत्त — १३१
- ३७) दप्तराचे मनोगत — १३२
- ३८) सुईचे आत्मवृत्त — १३३
- ३९) मला पडलेले स्वप्न... — १३४
- ४०) सावित्रीबाई फुले — १३५
- ४१) सौर ऊर्जा — १३६
- ४२) शाळेचा पहिला दिवस — १३६
- ४३) वसंत ऋतू — १३७
- ४४) महापूर — १३८
- ४५) आमच्या गावची जत्रा — १३९
- ४६) पावसाळ्यातील निसर्ग — १४०
- ४७) अंधश्रद्धेचा शाप — १४१

---

**(१२) कल्पनाविस्तार** — **१४२**

- १) जे खळांची व्यंकटी सांडो। — १४३
- २) लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण । — १४३

३) कष्टेविण फळ नाही । १४४

किंवा

यत्न तो देव जाणावा ।

४) सुसंगती सदा बडो । सुजन वाक्य कानी पडो । १४५

५) क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे । १४५

६) साक्षर जनता, भूषण भारता । १४६

७) जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जे आपुले...। १४७

८) सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जे करील तयाचे। १४८

९) जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण । १४९

१०) तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी । १४९

११) वाचाल तर वाचाल । १५०

१२) वाचवील पाणी, साठवील पाणी ।
त्यालाच फक्त जगवील पाणी । १५१

१३) वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे । १५२

१४) थांबला तो संपला, काळ पुढे चालला । १५२

१५) आलसस्य कुतो विद्या, अविद्यस्य कुतो धनम् । १५३

१६) गरज सरो, वैद्य मरो । १५४

१७) खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे । १५५

१८) महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती । १५६

१९) थेंबे थेंबे तळे साचे । १५६

२०) जनसेवा हीच ईश्वर सेवा १५७

२१) जो दुसऱ्यावर विश्वासला,
त्याचा कार्यभाग बुडाला । १५८

२२) मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।। १५९



# १ वर्णविचार

मराठी भाषेत एकूण ४८ वर्ण आहेत. त्यांना मुळाक्षरे असेही आपण म्हणतो. हे वर्ण पुढील प्रमाणे आहेत.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क् | ख् | ग् | घ् | ङ् |
| च् | छ् | ज् | झ् | ञ् |
| ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त् | थ् | द् | ध् | न् |
| प् | फ् | ब् | भ् | म् |
| य् | र् | ल् | व् | श् |
| ष् | स् | ह् | ळ् | |

मराठी भाषेत वर्णांचे तीन प्रकार पडतात.

**१) स्वर**

**२) स्वरादी**

**३) व्यंजने**

स्वर, स्वरादी आणि व्यंजने मिळून मराठी वर्णमाला तयार होते.